ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– II MARCH – APRIL 2024

Original Research Article

त्यासाठी त्यांनी ग्रामविकासाच्या विविध समस्यांचा विचार करून त्या सोडविण्यासाठी उपाययोजनाही सुचविल्या आहेत. त्यांनी ग्रामविकासासंदर्भात सुचविलेले विचार आजच्या काळातही प्रभावी आहेत.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील यावली या गावी ३० एप्रिल १९०९ रोजी झाला. त्याच्या वडिलांचे नाव बंडोपंत व आईचे नाव मंजूळा असे होते व त्याचे नाव माणिक होते. त्याचे अध्यामिक गुरू यांनी माणिकचे नाव तुकडया असे ठेवले. पुढे तुकड्याचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणून लौकिक झाले.ग्रामविकासाच्या शाश्वत विकासाचा मार्ग त्यांनी आपल्या अनेक प्रवचनातून व ग्रामगीता ह्या ग्रंथातून सांगितला आहे. भारतातील सर्वात जास्त जनसंख्या ही खेड्यापाड्यात राहते व तिची उन्नती करावयाची असल्यास त्याची सुरूवात ही खेड्यापाड्यापासून झाली पाहिजे, हे मर्म ओळखूण राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामविकासासाठी ग्रामगीतेचे लेखन केले . भारतांचा विकास करावयाचा असल्यास असल्याच ग्रामविकास महत्वाचा आहे. समाजातल्या सर्व घटकातील सर्व घटकातील लोकांचा उध्दार कसा होईल, याविषयी त्यांनी नेहमी चिंता केली, ग्रामोन्नती व ग्रामविकास हा त्यांच्या विचारसरणीचा जणू केंद्रबिंदूच होता.. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे संत असून ही महंत नव्हते. प्राचीन संस्कृतीचे अभिमानी असूनही त्याचा दृष्टीकोन वैज्ञानिक व शास्त्रीय होता. त्याच्या वाणीने व लेखणीने केवळ राज्यातच नव्हे तर संपूर्ण देशात सामाजिक व राष्ट्रीय जागृतीचे कार्य घडवून आणले. समाजातील अज्ञान, अंधकार, दुर करण्यासाठी व समाजात वैज्ञानिक मनोवृत्तीची जोपासना करण्यासाठी मोलाचे कार्य केले.सदरील संकल्पनात्मक व चिकित्सक वर्णनात्मक शोध निंबंधातून त्यांच्या विचारांचा शाश्वत विकासाच्या दृष्ट्रीने विचार मागोवा घेण्यात आलेला आहे.

**शोध निबंधाची उद्दिष्टे :**

१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या शाश्वत विकासाबाबतच्या विचारांचा शोध घेणे.

२) आजच्या परिस्थितीच्या संदर्भात शाश्वत विकासासाठी उपाय योजना सूचविणे.

**कार्यात्मक व्याख्या :**

१) **शाश्वत विकास :-**

'शाश्वत विकास म्हणजे असा विकास की जो भविष्यकालीन पिढ्यांच्या त्यांच्या स्वत: च्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेशी कोणतेही तडजोड न करता सध्याच्या गरजा पूर्ण करणे होय.'

**शाश्वत विकासाची गरज व महत्व :**

व्यक्ती आजच्या वैज्ञानिक व स्पर्धात्मक युगात वावरतांना समूहात एकटा पडला आहे.अनेक समस्यांच्या विळख्यात व्यक्ती सापडला आहे. आर्थिक मिळकतीची साधने वाढली तरी तो असमाधानी आहे. अनेक संपर्कांची साधने वाढलेली असली

तरी तो एकांगी पडला आहे. त्याच्या बौध्दिक विकासाबरोबर त्याचा शारिरीक व सामाजिक विकास साधला जात नाही. त्यामुळे सामाजिक प्रश्न व्यक्तीगतरित्या हाताळतांना अनेक समस्या येत आहे. शरिराने धष्टपुष्ट दिसत असला तरी तो मानसिक व शारिरीक दृष्ट्या आजारांनी ग्रासलेला आहे. म्हणजेच त्याचा व्यक्तीचा शाश्वत विकास अडथळा

व्यक्तीला आपले जीवन सुखी समाधानी व आनंदाने जगण्यासाठी म्हणजे शाश्वत विकास साध्य करण्यासाठी जीवन कौशल्य महत्वाची व गरजेची आहे.

**शोध निबंधाची गृहितके :**

१) मानवी जीवनात शाश्वत विकास महत्वाचा आहे.

२) राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी शाश्वत विकासासाठीची शिकवण दिली आहे.

**शोध प्रश्न :**

१) ग्रामगीतेत शाश्वत विकासाची शिकवण दिली आहे का ?

२) ग्रामगीतेतील शाश्वत विकासाची भूमिका जाणून घेणे?

**संशोधन पध्दती:**

सदरील संशोधन विषयासाठी दस्तऐवज विश्लेषण पध्दती वापरली आहे. ग्रामगीतेतील निवडक अध्ययनांचा विचार केला आहे.

**संशोधन विषयाची व्याप्ती :**

सदरील संशोधन विषयात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी शाश्वत विकासासाठीचे अनेक मार्ग सांगितलेले आहे.

**मर्यादा :**

१) सदरील संशोधनात फक्त ग्रामविकासाच्या संदर्भात शाश्वत विकासाचा अभ्यास केलेला आहे.

२) सदरील संशोधनात फक्त राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेत विसाव्या अध्याया पर्यंत मांडलेल्या विचारांचा समावेश करण्यात आलेला आहे.

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे ग्रामगीतेतील शाश्वत विकासाबाबतचे विचार:** राष्ट्रंसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामविकासातून राष्ट्रविकासाची संकल्पना ग्रामगीतेतू मांडली आहे. ग्रामगीतेतून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे राष्ट्रविकासासाठी चे शाश्वत विकासाचे विचार प्रवर्तीत होतात. ग्रामगीतेत एकूण एक्केचाळीस अध्याय असून प्रत्येक अध्यायात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामविकासासाठीचा व ग्रामविकासातून राष्ट्रविकासाचा विचार मांडलेला आहे.

पहिल्या अध्यायात देवदर्शन बाबत विचार मांडतांना ते म्हणतात, की देव अनुभवाचा आणि पाहावयाचा असल्यास माणसाने

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–XI, ISSUE– II MARCH – APRIL 2024

Original Research Article

आपले हदय शुध्द करावे, देव हा जातपात पाहत नाही, देव प्रेमाचा भूकेला आहे. देव माणसामाणसात भेदाभेद करत नाही. थोडक्यात म्हणजे मानवधर्म हाच एकमेव धर्म आहे असे ते म्हणतात.धर्माध्ययन ह्या ते म्हणतात,

'अनेक प्राणी जेथे राहती | त्या सर्वांची रहावी सुस्थिती |

समान समाधानाची गति | त्यास धर्म म्हणावे ||

अनेक जातीपातीच्या धर्माच्या लोकांना इतराप्रति सौख्य सौख्य ठेवण्याचे धर्म शिकवितो .सर्वांचा विकास, समाधान धर्मातून साध्य झाले पाहिजे, धर्माने योग्य कर्माची शिकविण मिळाली पाहिजे असे म्हणतात. जिवनाचे ते चार आश्रमात विभाजन करून ब्रम्हचार्य, ग्रहस्थाश्रम, वानप्रस्थश्रम, तसेच संन्यासश्रमातील मानवी कर्तव्यांचा उपदेश करतात. वर्णव्यवस्था ह्या अध्यायात ते म्हणतात. वर्ण हे जन्माने नव्हे तर कर्माने ठरतात.सर्वांनी कर्म करावे व गावाचा उध्दार करावा अशी ते शिकवण देतात. संसर्ग प्रभाव ह्या अध्यायात ते स्वच्छतेचा मंत्र देतात व आरोग्य संपन्न, निरोगी समाज जिवनाचा उपदेश करतात.

ते म्हणतात,

प्रथम करावी आपली शुध्दि | शरीर शुध्दि, हदयशुध्दि |

घरशुध्दि ,ग्रामशुध्दि | सर्वतोपरी

जैसे तुम्ही कराल आपले घर | ते पाहतील जन सत्वर |

करतील तैसेची प्रकार | आपल्या घरी|

आचार प्राबल्य ह्या अध्यायात ते न्यायाने वागण्याचा उपदेश करतात. ते म्हणतात.

"लोकांसि जे जे शिकवावे | आधी आपणचि आचरावे |

नुसते पुढारी म्हणूनि मिरवावे | तेणे आदर न वाढे ||"

पुढा-यांनी आपले आचरण हे साधेपणाचे ठेवावे, तसेच लोकांना शिकविण्याआधी स्वत: शिकवण आचरणात आणावी. सत्य ,न्याय, जनहिताच्या मार्गाचा पुढा-यांनी मार्ग स्विकारावा व गावाचा उध्दार करावा असे ते म्हणतात.

प्रचारमहिमा ह्या अध्यायात ते साधू संताच्या शिकवणूकीचा प्रचार करण्याचा व चांगल्या भावनेने करण्याचा उपदेश करतात.ते म्हणतात,

प्रचार जेथे धावला दिसे | तेथील गाव स्वर्गची भासे |

जनलोक न्यायास साजेसे | वागती तेथे ||

मित्रहो ! आदर्श कराया ग्राम | उत्तम प्रसारक पाहिजे प्रथम |

तरी चाले उत्तम काम | गावाचे आपल्या ||

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– II MARCH – APRIL 2024

Original Research Article

सेवाधर्म ह्या अध्यायात ते सेवेचे व जनसेवेचा उपदेश करतात. सेवासामर्थ्याबद्दल सांगतात. सेवा ही निस्वार्थ असावी असे ते म्हणतात. ग्रामरक्षणाची जबाबदारी ही प्रत्येकांचे आहे. ग्रामरक्षणासाठी संघटनेला ते महत्व देतात. संघटन करतांना ते सत्ता ही सज्जन लोंकांच्या हाती असावी असे ते म्हणतात. गावाला निर्व्यसनी बनविण्यासाठी संघटनातील लोकांनी कार्य करावे. गावातील अनिष्ठ प्रथा उदा. बळी प्रथा, हुंडा प्रथा बंद कराव्या. गावातील तरूणांमध्ये सहकार्य धर्माची जोपासना करावी. संकटसमयी ते एकमेकांच्या मदतील धावून जातील अशा रितीने त्यांच्यावर संस्कार करावेत. असे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात. ग्रामस्वच्छतेला ते महत्व देतात. गावातील सर्व जनांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी स्वच्छतेचा ते मंत्र देतात.ते म्हणतात माणसाचे आरोग्य चांगले राहण्यासाठी त्यांनी सात्विक अन्न घ्यावे. साधेपण स्वच्छ व टापटिप राहावे. ताजा भाजीपाला व अन्नाचे सेवन करावे. श्रम हीच संपत्ती आहे. असे ते प्रतिपादन करतात.

श्रमिकास जेणे लाभेल अन्न | ते कर्म श्रेष्ठ यज्ञाहून |

जिवन- शिक्षण ह्या अध्यायात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शाश्वत विकासाच्या शिक्षणाची शिकवण देतात. ते म्हणतात जिवन आणि शिक्षण हे भिन्न नसावे. तर शिक्षणातून जिवनाचे शिक्षण मिळावे, जिवन जगण्याची तयारी व्हावी , शिक्षण हे जिवन व्यवहाराशी सांगड घालणारे असावे. शिक्षण हे केवळ दिखावू असे नये.मुला -मुलींना समान शिक्षण द्यावे. त्यामुळे गावाचे भूषण वाढेल. मुला-मुलांना शिक्षण देतांना त्याच्यात भेदाभेद करू नये.त्यासाठी ते म्हणतात,

'शिक्षणातचि जीवनाचे काम | दोन्हीची सांगड व्हावी उत्तम |

चिंता नसावी भोजनासाठी दाम |मागण्याची भीक जैसी ||'

'ऐसे जीवन आणि शिक्षण | याचे साधावे गठबंधन |

प्रथम पासूनचि सर्वांगीण | शिक्षण द्यावे तारतम्ये||'

शिक्षणातून माणसांच्या अंगी विनय यावा. निर्भयता यावी,निश्चय वाढवा. जीवनातील अडचणीवर विजय मिळविण्याची क्षमता माणसांच्या अंगी निर्माण व्हावी. शिक्षणामुळे जिवन हे सुंदर व्हावे. असे ते म्हणतात. नुसत्या पुस्तकी शिक्षणाला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज महत्व देत नाही, तर ते म्हणतात मुलांना मल्लखांब, कुस्ती, असे शरीर मजबूत व तंदुस्त करणारे शिक्षण देखील देण्यात मुलांना द्यावे जेणे करून ते अन्यायी व्यक्तीशी प्रसंगी चार-हात करू शकतील. चौदा विद्या व चौसष्ट कलांची शिकवण मुलांना द्यावी. मुलांचा सर्वांगीण विकास साधावा म्हणजेच त्यातून गावाचा विकास साधला जाईल.महिलांच्या विकासाकडे ते विशेष लक्ष देतात, महिलांनी ते पुज्यनिय मानतात. मातेचे सर्व मानव जातीवर उपकार आहेत. महिलांना ते जगाचे उध्दारकर्ते संबोधतात. वरील विवेचन व स्पष्टीकरणावरून राष्ट्रसंच तुकडोजी महाराज यांचे ग्रामविकासासाठीचे व ग्रामविकासातुन राष्ट्रविकासासाठीचे शाश्वत विकास स्पष्ट होतात.

**उदिष्ट क्रमांक १ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या शाश्वत विकासाबाबतच्या विचारांचा शोध घेणे.**

१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे ग्रामविकासालाच राष्ट्रविकासाचा शाश्वत मार्ग मानतात.

२) शिक्षण व जिवनोपयोगी असावे, म्हणजे जिवनातील प्रश्नाची व्यक्तीला सोडवणूक करता येईल. म्हणजे शिक्षण हे शाश्वत असावे.

३) शिक्षणातून बौध्दिक विकासाबरोबरच सामाजिक व शारिरीक विकासादेखील व्हावा.

४) शिक्षणातुन निर्भयता, निर्णयक्षमता, दृढ निश्चय व्यक्तीत यावा.

५) ग्रामविकासासाठी संघटन असावे. संघटनेची सत्ता ही चांगल्या व्यक्तींच्या हाती असावी.

६) ग्रामच्या सामाजिक आरोग्यासाठी स्वच्छचा महत्वाची आहे. प्रत्येकाने आपले शरीर व घरापासून स्वच्छतेची सुरूवात करावी.

७) सकस आहार व पौष्टीक अन्नाला उत्तम आरोग्यासाठी महत्व देतात.

८) मानव धर्माबरोबरच ते कर्माला महत्व देतात.

९) महिलां सर्व मानव जातीची गुरू आहे.

**उद्दिष्ट क्रमांक २ आजच्या परिस्थितीच्या संदर्भात शाश्वत विकासासाठी उपाय योजना सूचविणे.**

१) वाढते शहरीकरण रोखण्यासाठी तसेच शहरावरील वाढत्या लोकसंख्येचा ताण कमी करण्यासाठी ग्रामविकासाकडे शासन व जनता दोघांनी ही लक्ष देणे आवश्यक आहे.

२) गावात चांगले शिक्षण, आरोग्यांच्या सोयी सुविधा बरोबरच, छोटया -उद्योग धंद्यांची उभारणी करण्यासाठी शासनाने प्रयत्न करावे. तसेच लघु-उद्योगांच्या उभारणीसाठी आर्थिक मदत करावी.

३) देशात वाढत चाललेली बेरोजगारी सोडविण्याचा औद्योगिकीकरण हा उपाय नसून छोटया -छोट्या लघुद्योगांचे पुनर्रजिवन करावे. जेणे करून अनेक कुंटूंबाना गावातच काम मिळेल.

४) केवळ दिशाहिन पुस्तकी शिक्षण देण्यापेक्षा जिवनोपयोगी शिक्षण द्यावे. शिक्षणाला प्रात्यक्षिक अनुभवाचा आधार द्यावा. अध्ययनार्थीत कौशल्यांचा विकास व्हावा.

५) गावातील चांगल्या संघटनासाठी प्रयत्न करावे.

६) पुस्तकी शिक्षणबरोबरच शारिरीक शिक्षणाकडे देखील लक्ष देण्यात यावे.

**समारोप:**

थोडक्यात सांगावयाचे म्हणजे राष्ट्रसंत तुकडोजी महारांजानी आपल्या जिवन कार्यातून, प्रवचनातून तसेच ग्रामगितेच्या

माध्यमातून व्यक्तीच्या, समाजाच्या, गावाच्या व राष्ट्राच्या शाश्वत विकासाचा मार्ग सांगितला आहे. त्यावेळी सांगतेले विचार आजही तितकेच महत्वाचे व मोलाचे ठरतात. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचार अंगिकार केल्यास वाढत्या शहरीकरणाची समस्या, मूल्यांच्या -हासाची समस्या, बेरोजगारी आदी सारख्या अनेक समस्यावर उपाय सापडतात. जिवन शिक्षणाचा मार्ग सापडतो. मनुष्याला सुखी, समाधानी, निरोगी आरोग्याचा मूलमंत्र मिळतो. म्हणूनच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे विचार शाश्वत विकासाला दिशा देणारे आहेत.

**संदर्भ सूची:**

*१) राष्ट्रसंत श्री. तुकोडोजी महाराज, (ग्रामगीता), ग्रामगीता प्रकाशक समिति c/o प्रिंटर्स ट्रेंडिग कंपनी,अभ्यंकर पुतव्य, महाल ,नागपूर*

*२) रवि जाधव, गौतम गायकवाड,(२०१५),शिक्षणातील आधुनिक विचार प्रवाह,कैलास पब्लीकेशन्स औरंगाबाद.*

*३) करंदीकर सुरेश,मंगरूळकर मिना, (२००२),उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण,फडके प्रकाशन,कोल्हापूर.*

*४) हिरा अहेर, (१९९५), उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक,विद्या प्रकाशन नागपूर.*

*५) अरविंद दुनाखे, (२००७),उदयोन्मुख भारतातील समाज, शिक्षण व शिक्षक,नित्य नूतन प्रकाशन*

*६) विश्वंभर कुळकर्णी,.ना.ग.पवार.,म.बा.कुंडले,.रा.गुणे. शिक्षणाचे तात्विक,सामाजिक व सांस्कृतिक यथार्थदर्शन भाग -1. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक-४२२२२२*

*७) विश्वंभर कुळकर्णी,.मधुकर सोनार .प्रा.श्रीरंग गुणे,प्रा.प्रतिभा वीरकर .शिक्षणाचे तात्विक,सामाजिक व सांस्कृतिक यथार्थदर्शन भाग-2 -यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक-४२२२२२*

*८) संवाद पत्रिका,(२०२३) यचममुवि.प्रकाशन नाशिक*

---

*Cite This Article:*

**डॉ.सोनुने एस.एस. (2024).** *राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे शाश्वत विकासाबाबतचे विचार'.* In Educreator Research Journal: Vol. XI (Number II, pp. 302–308). **ERJ.** https://doi.org/10.5281/zenodo.10911933